दुरध्वनी क्र. :०२२-२०८३०२७४

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
''निश्चय '' नवीन प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
तुकाराम भिकाजी कदम मार्ग, भायखळा (पुर्व),
मुंबई - ४०० ०२०.

E-mail-
adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

जा.क्र.अपोमसं(वा)/४५/नियो/गणेशोत्सव-२०२५/प्रेस नोट/३८४२ /२०२५, मुंबई. दि. 21 AUG 2025

## •• प्रेस नोट ••

दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५ या कालावधीत राज्यात गणेशोत्सव साजरा होणार आहे. गणेशोत्सवाकरीता मोठया प्रमाणात गणेशभक्त वेगवेगळया खाजगी वाहनांमधुन, तसेच राज्य परिवहन विभागाच्या बसेसमधुन कोकणात जातात. गणेशोत्सवकाळात मुंबईहून कोकणामध्ये जाणाऱ्या मुंबई - गोवा राष्ट्रिय महामार्ग क्र.६६ वर गणेशभक्तांची आणि वाहनांची प्रचंड गर्दी असते. गणेशभक्तांचा प्रवास सुखकर, सुरक्षित व विना अपघात व्हावा याकरीता या मार्गावर गणेश चतुर्थी ते अनंत चतुदर्शी या कालावधीत नवी मुंबई शहर व जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग तसेच महामार्ग पोलीस विभागाकडून बंदोबस्त नेमला जातो.

गणेशभक्तांना प्रवासा दरम्यान अडचण होवू नये म्हणून **मुंबई -गोवा महामार्गावर जड अवजड वाहनांच्या आवागमनास बंदी** असल्याबाबत शासनातर्फे सह सचिव,गृह, (परिवहन) यांचे कार्यालयाकडून बंदी आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याबद्दल वाहतुकदार संघटनांना अवजड वाहनांना कोणत्या तारखेला व वेळेला बंदी आहे त्याबद्दलचा तक्ता पुरविण्यात येत आहे.

तसेच महामार्ग पोलीसांकडून गणेशभक्तांसाठी प्रवास करीत असताना वाहतूक कोंडी झाल्यास किंवा इतर समस्या उद्भवल्यास NH-66 महामार्गावरील संबंधित जिल्हयांचे हेल्पलाईन /नियंत्रण कक्ष क्रमांक पुरविण्यात येत आहेत.

**(प्रविण साळुंके )**
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

उप-संचालक (वृत्त विभाग),
माहिती व जनसंपर्क संचनालय,
मंत्रालय, मुंबई

**गणेशोत्सव काळात जड-अवजड वाहन बंदी - २०२५**

| | |
|---|---|
| १) | **( गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास / श्रींच्या मुर्तीचे आगमन /दिड दिवसांच्या गणपतींचे विर्सजन )**<br>**दिनांक २३/०८/२०२५ रोजी सकाळी ००.०१ वाजेपासून ते दिनांक २८/०८/२०२५ रोजी रात्री २३:०० वाजेपर्यंत** या कालावधीत मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टना पेक्षा जास्त आहे त्यांची वाहतूक **पुर्णतः बंद करण्यात यावी.** ( जड-अवजड वाहने, मल्टीएक्सल, ट्रेलर्स , ट्रक/लॉरी, इत्यादी वाहने) |
| २) | **(०५ दिवसांच्या गणपतीचे विर्सजन/गौरी गणपतीचे विसर्जन/०७ दिवसांच्या गणपतीचे विर्सजन/ काही अंशी परतीचा प्रवास)**<br>**दिनांक ३१/०८/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता ते रात्री २३:०० वाजेपर्यंत** या कालावधीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त आहे. त्यांची वाहतूक **पुर्णतः बंद करण्यात यावी.** ( जड-अवजड वाहने, मल्टीएक्सल, ट्रेलर्स , ट्रक/लॉरी, इत्यादी वाहने) |
| ३) | **(गौरी व ०७ दिवसांच्या गणपतीचे विर्सजन/ काही अंशी परतीचा प्रवास)**<br>**दिनांक ०२/०९/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता ते रात्री २३:०० वाजेपर्यंत** या कालावधीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त आहे. त्यांची वाहतूक **पुर्णतः बंद करण्यात यावी.** ( जड-अवजड वाहने, मल्टीएक्सल, ट्रेलर्स , ट्रक/लॉरी, इत्यादी वाहने) |
| ४) | **(अनंत चतुर्दशी ११ दिवसांच्या गणपतीचे विसर्जन/ परतीचा प्रवास)**<br>**दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता ते दिनांक ०७/०९/२०२५ रोजी रात्रौ २०.०० वाजता** पर्यत या कालावधीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टना पेक्षा जास्त आहे. त्यांची वाहतूक **पुर्णतः बंद करण्यात यावी.** ( जड-अवजड वाहने, मल्टीएक्सल, ट्रेलर्स , ट्रक/लॉरी, इत्यादी वाहने) |
| ५) | **( जड-अवजड वाहने, मल्टीएक्सल, ट्रेलर ,ट्रक/लॉरी, इत्यादी वाहने केव्हा प्रवास करतील )**<br>अ.क्र. १ ते ४ नुसार मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर संपूर्ण प्रवास बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत अशी वाहने, ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे. (जड-अवजड, मल्टीएक्सल, ट्रेलर्स, ट्रक्स/लॉरी) अशा वाहनांना,<br>१) दिनांक २८/०८/२०२५ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दिनांक ३१/०८/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा. पर्यत<br>२) दिनांक ३१/०८/२०२५ रोजीचे रात्रौ २३.०० वा. पासुन ते दिनांक ०२/०९/२०२५ रोजीचे सकाळी ०८.०० वा. पर्यत<br>३) दिनांक ०२/०९/२०२५ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दिनांक ०६/०९/२०२५ रोजी ०८.०० वा. पर्यत या वेळेत वाहतूकीस परवानगी राहील.<br>**तसेच सर्व वाहने दिनांक ०७/०९/२०२५ रोजी रात्रौ २०.०० वा. नंतर नियमीत प्रवास करतील.** |

परंतु वरील निर्बंधामधून जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथुन आयात- निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, तसेच दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाक गॅस सिलेडर, मेडीसिन, लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणा-या वाहनांना तसेच अत्यावश्यक सेवेकरिता असलेल्या वाहनांना लागू राहणार नाही.

तसेच मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या रस्ता रूंदीकरण/रस्ता दुरूस्ती कामकाज आणि साहित्य, माल इत्यादी ने-आण करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

# गणेशोत्सव २०२५ करिता मुंबई -गोवा महामार्गावरील मार्गबदल योजना

# (Diversion Plan)

**रायगड** जिल्हयात जाणाऱ्या गणेशभक्तांनी पनवेल शहरातील वाहतूक कोंडी टाळण्याकरीता तसेच सुखकर प्रवासाकरीता खालील मार्गांनी प्रवास करावा.

| अ.क्र. | मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ | अंतर (कि.मी.) | पर्यायी मार्ग | अंतर (कि.मी.) | पर्यायी मार्गाने वाढणारे अंतर (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कळंबोली - पळस्पे फाटा (N.H. 48) मार्गे | ७.५ | कळंबोली-पनवेल बायपास-डी पॉईंट-करंजाळे टोलनाक-पळस्पे फाटा | १० | २.५ |
| २ | कळंबोली - वाकण | ६७.५ | मुंबई-पुणे एक्सप्रेस वे - खोपोली - पाली - वाकण | ७६ | ८.५ |

**रत्नागिरी, सिंधुदुर्ग** या भागातील जाणाऱ्या गणेशभक्तांनी उत्सवा दरम्यान सोडण्यात येणाऱ्या जादा बसेस, वाहने व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी पाहता खालील पर्यायी मार्गांचा अवलंब करावा जेणेकरून त्यांचा प्रवास लवकरात लवकर विना अडथळा व सुखकर होईल.

| अ.क्र. | मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ | अंतर (कि.मी.) | पर्यायी मार्ग | अंतर (कि.मी.) | पर्यायी मार्गाने वाढणारे अंतर (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | कळंबोली - चिपळुण | २१८ | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - उंब्रज - पाटण - कोयना नगर - कुंभार्ली घाट - खेर्डी - चिपळुण | ३४५ | १२७ |
| ४ | परशुराम घाट बंद झाल्यास रा. महा. क्र. ६६ वरील पर्यायी मार्ग | ८.५ | पिरलोटे ता. खेड-चिरणी-आंबडस-कळंबस्ते-चिपळुण | १६ | ७.५ |
| ५ | कळंबोली - हातखंबा | २९५ | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - कराड - वाठार - टोप उजवीकडे वळण घेवुन मलकापुर - शाहुवाडी - आंबा घाट - साखरपा - हातखंबा. | ४०७ | ११२ |
| ६ | कळंबोली - हातखंबा | २९५ | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - सातारा-कराड-मलकापुर-शाहुवाडी-आंबा घाट-साखरपा-हातखंबा | ४०५ | ११० |
| ७ | कळंबोली - राजापुर | ३४५ | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - कराड - वाठार - टोप उजवीकडे वळण घेवुन मलकापुर - शाहुवाडी - आंबा घाट - लांजा - राजापुर. | ४२२ | ७७ |
| ८ | कळंबोली - कणकवली | ४०० | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - कराड - कोल्हापुर शहरातुन रंकाळा तलावावरुन - कळे - गगनबावडा घाट - वैभववाडी - कणकवली. | ४५५ | ५५ |
| ९ | कळंबोली - सावंतवाडी | ४५५ | मुंबई - पुणे एक्सप्रेस वे - (एनएच ४) सातारा - कराड - कोल्हापुर - निपाणी - आजरा - आंबोली घाट - सावंतवाडी. | ४९० | ३५ |

## गणेश भक्तांना काही अडचणी उद्‌भवल्यास संबंधित जिल्हयाचे पोलीस नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | नियंत्रण कक्ष | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १ | महामार्ग पोलीस, मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई | ९८३३४९८३३४, ९५०३५१११०० |
| २ | महामार्ग पोलीस, रायगड परिक्षेत्र नियंत्रण कक्ष, | ७३०४३८८९८८ |
| ३ | नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्ष, | ०२२—२७५७२२९८, २७५७४९२८ |
| ४ | रायगड पोलीस नियंत्रण कक्ष | ९१२१४१—२२८४७३, २२२१०० |
| ५ | रत्नागिरी पोलीस नियंत्रण कक्ष | ०२३५२—२२२२२२ |
| ६ | सिंधुदुर्ग पोलीस नियंत्रण कक्ष | ०२३६२—२२८२००, २२८६१४ |